नियमीत फौजदारी प्रकरण क्र.१६०/२०१९ (गुन्हा क्रमांक ९८/२०१९) मधील निशाणी क्र.४४ वरील आदेश.
(आदेश पारीत दिनांक –१४/०८/२०२५.)
सरकार वि. भारत व इतर
**CNR No.MHLA050016762025**

१. सदरचा अर्ज अर्जदार नामे - विश्वनाथ पि.एकनाथ केंद्रे, रा.केंद्रेवाडी, ता. अहमदपूर, जि.लातूर यांनी ५ ग्रॅम वजनाचे सेव्हन पीस परत मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. तपासीक अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन जप्त करण्यात आलेले सेव्हन पीस अर्जदार यांना परत करण्यात हरकत नसल्याने योग्य तो आदेश होणेस विनंती केली आहे. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांच्या म्हणण्यात जप्त मुद्देमाल हा ओळख पटवण्यासाठी महत्त्वाचा पुरावा असून सदर जप्त मुद्देमाल हा अर्जदारास परत दिल्यास अर्जदार त्यात बदल करु शकतो किंवा विक्री करु शकतो. पुढे त्यांनी अर्जदाराच्या मालकीच्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर योग्य तो आदेश होण्यास विनंती केली आहे.

३. अर्जदाराचे विधीज्ञ व सहा. सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला.

४. सद्यपरिस्थितीत अर्जदार हा जप्त ५ ग्रॅम वजनाचे सेव्हन पीसचा प्रथमदर्शनी मालक व कब्जेदार असल्याचे दिसून येते. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वर नमूद ५ ग्रॅम वजनाचे सेव्हन पीस हे जप्त करण्यात आल्याचे दिसून येते.

५. निश्चितपणे सदर गुन्हयासंदर्भातील प्रकरण निकाली निघण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे, सदर ५ ग्रॅम वजनाचे सेव्हन पीस पोलीस स्टेशनमध्ये तसेच राहिल्यास अर्जदारास त्याचा वापर करता येणार नाही. अशा परिस्थितीत, जप्त ५ ग्रॅम वजनाचे सेव्हन पीस हे अर्जदारास वर नमूद परिस्थिती विचारात घेता काही अटी व शर्तीच्या अधीन राहून सुपूर्तनाम्यावर देणे योग्य ठरेल. त्यामुळे, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

-ः आ दे श ःः-

१. अर्ज मंजूर करण्यांत येतो.

२. पोलीस स्टेशन किनगांव अपराध क्रमांक ९८/२०१९ ( नियमीत फौजदारी प्रकरण क्र.१६०/२०१९) मध्ये जप्त असलेले ५ ग्रॅम वजनाचे सेव्हन पीस हे अर्जदार - विश्वनाथ पि.एकनाथ केंद्रे, रा.केंद्रेवाडी, ता.अहमदपूर, जि.लातूर यांचेकडून ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार रुपये केवळ) रुपयाचा सुपूर्तनामा बॉन्ड घेतल्यानंतर अर्जदार यांच्या ताब्यात देण्यात यावे.

३. अर्जदार यांनी वर नमूद जप्त ५ ग्रॅम वजनाचे सेव्हन पीसच्या स्वरुपामध्ये सदर गुन्हयासंदर्भातील प्रकरणाचा निकाल लागेपावेतो कोणत्याही प्रकारे बदल करु नये व त्यांनी सदर जप्त ५ ग्रॅम वजनाचे सेव्हन पीस निकाल लागेपर्यंत विकू नये किंवा हस्तांतरीत करु नये किंवा त्यावर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीचा हितसंबंध निर्माण करु नये.

४. अर्जदार यांनी सदर जप्त ५ ग्रॅम वजनाचे सेव्हन पीस न्यायालय आदेश करील तेंव्हा आदेशाप्रमाणे हजर करावे.

५. संबंधीत पोलीस स्टेशन अधिकारी अथवा तपासी अंमलदार यांनी सदर वर नमूद जप्त जप्त ५ ग्रॅम वजनाचे सेव्हन पीसचे छायाचित्र (निगेटिव्ह सह) काढून घ्यावेत किंवा मुद्देमालाचे छायाचित्र डिजीटल प्रणालीचे कॅमे-याने काढल्यास त्या कॅमे-याचे मूळ मेमेरी कार्ड जपून सुरक्षित ठेवावी व नियमाप्रमाणे योग्य तो सविस्तर पंचनामा पंचासमक्ष करावा.

६. संबंधीत अपराध क्रमांक ९८/२०१९ ( नियमीत फौजदारी प्रकरण क्रमांक - १६०/२०१९) मधील तपासिक अंमलदार व पोलीस स्टेशन अधिकारी यांनी आदेशाची पूर्तता केल्यानंतर त्याबाबत न्यायालयास लेखी स्वरुपात कळवावे.

८. सहाय्यक अधिक्षक यांनी संबंधीत आदेशाबाबत पोलीस स्टेशन, किनगांव यांना कळवावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2025.08.14 16:23:02 +0530

**( आर.डी. वाबळे )**

दिनांक - १४/०८/२०२५.

अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.